रे.मु.नं. ६४९/२०२१
<u>अमोल वि. रामेश्वर आणि ईतर</u>

**<u>निशाणी क्र. ३० वरील आदेश</u>**

१. प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र. १ व ३ यांची जादा कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा हा वाटपासाठी व निरंतर मनाईबाबत असून प्रतिवादीचे अर्जात कथन असे की, प्रतिवादी हे मुदतीमध्ये जादा कैफियत दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादीची जादा कैफियत अभिलेखावर न आल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीने जादा कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून कैफियत स्विकारण्याची विनंती केली.

२. सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल केले असून वादीनी अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. वादीने पुढे कथन केले आहे की, सदरचा अर्ज हा खरा व कायदेशीर नाही. प्रतिवादी हे जाणूनबुजून उशीर करीत आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी जाणूनबुजून गुंतागुंत व्हावी म्हणून दावा मिळकत प्रतिवादी क्र. ४ यास विक्री केली आहे. अर्ज मंजूर करणे झालेस रु. ३०००/— खर्चासह मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा वाटपाचा व मनाईचा आहे. परंतु दाव्याचे स्वरुपा पाहता दावा हा गुणदोषांवर निकाली होणेकरीता दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्ववाचा विचार करता प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे. त्यामुळे मी त्याकरिता खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. १ व ३ यांना जादा कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब रु. ३००/— इतक्या खर्चासह माफ करण्यात येत आहे.

३) प्रतिवादी यांनी वर नमूद खर्चाची रक्कम वादी यांना दयावी असे आदेशित करण्यात येते.

४) वादी यांना खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी यांची जादाची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

सही/-

(श्रीमती गायत्री एस. पाटील)

दिनांक : १९/११/२०२४

३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
बार्शी, जि. सोलापूर.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **S.V. Kokate (Grade III)** |
| Name of the court | : | **Gayatri S. Patil** |
| | | **3rd Jt. CJJD & JMFC,** |
| | | **Barshi, Dist. Solapur.** |
| Judgment/order declared on | : | **19/11/2024** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **19/11/2024** |
| Judgment/order uploaded on | : | **21/11/2024** |